महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या नवीन पारंपारिक सोडतींच्या तिकीट विक्रीबाबत दि.०३/०९/२०१७ चा करार रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग,

शासन परिपत्रक क्र :-मरालॉ२०१७/प्र.क्र.९२/लॉ-२

महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला, मंत्रालयासमोर,मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर,२०१७.

पहा : १) मे. समित ऑनलाईन ट्रेड सोल्युशन प्रा. लि., मुंबई. यांचे दि.१४/०७/२०१७ चे पत्र
२) मे. सेरेनिटी ट्रेडर्स प्रा.लि., मुंबई यांचे दि.१४/०७/२०१७ चे पत्र.
३) आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी यांची समक्रमांक दि.०१/०९/२०१७ ची २पत्रे
४) उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवीमुंबई यांचे पत्र क्र. उपसं(विवले) न.पा./मरालॉ/२३०६/२०१७, दि.१३/०९/२०१७ .

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र राज्य लॉटरीची नवीन पारंपारिक सोडतींची तिकीट विक्रीसाठी ठोक अभिकर्ते म्हणून मे. सेरेनिटी ट्रेडस् प्रा.लि., मुंबई व मे. समित ऑनलाईन ट्रेड सोल्युशन्स प्रा.लि., मुंबई यांनी शासनाबरोबर दि.०३ सप्टेंबर,२०१३ रोजी करार केलेला होता. त्या कराराची मुदत दि.३०/०९/२०१७ पर्यंत होती. सदरचा करार दि.०१/०८/२०१७ पासून रद्द करीत असल्याचे प्रस्तुत कंपन्यांनी वरील संदर्भ क्र.१ व २ येथील नमूद पत्रांन्वये स्वच्छेने कळविले होते. सदरची पूर्व सुचना शासनास प्राप्त झाल्यानंतरही प्रस्तुत अभिकर्त्यांनी नियमितपणे दि.३१ जुलै,२०१७ पर्यंत तिकीट विक्री करून आश्वासित नफा शासनाकडे भरणा केलेला आहे. त्यानुषंगाने दोन्ही ठोक अभिकर्त्यांना दिनांक ०१/०८/२०१७ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली होती. सदर नोटीसला दिलेले उत्तर व कराराच्या तरतुदी विचारात घेऊन कराराच्या परिच्छेद १९(iv) नुसार उर्वरित कालावधीतील एका मासिक सोडतीचा देय होत असलेला रू.११,५५,०००/- इतका आश्वासित नफा करार रद्द केल्यामुळे नुकसान भरपाई म्हणून शासनाकडे ७ दिवसांत भरणा करण्याबाबत मे. सेरेनिटी ट्रेड प्रा.लि. या ठोक अभिकर्त्यांस दि.०१/०९/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

तसेच कराराच्या परिच्छेद १९(iv) नुसार उर्वरित कालावधीतील १६ साप्ताहिक सोडतीचा देय होत असलेला रू.३६,०८,०००/- इतका आश्वासित नफा करार रद्द केल्यामुळे नुकसान भरपाई म्हणून शासनाकडे ७ दिवसांत भरणा करण्याबाबत मे. समित ऑनलाईन ट्रेड सोल्युशन्स प्रा.लि., मुंबई या ठोक अभिकर्त्यांस दि.०१/०९/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

मे. समित ऑनलाईन ट्रेड सोल्युशन्स प्रा.लि., मुंबई यांनी नुकसान भरपाई म्हणून धनाकर्ष क्र. ००३८४२, दि.०६/०९/२०१७ अन्वये रू.३६,०८,०००/-(रू. छत्तीस लक्ष आठ हजार फक्त) व मे. सेरेनिटी ट्रेडर्स प्रा.लि.यांनी धनकर्ष क्र.०६९४९२ दि.०६/०९/२०१७,अन्वये रू.११,५५,०००/-(रू. अकरा लक्ष पंच्चावण्ण हजार फक्त) दि.७/०९/२०१७ रोजी उपसंचालक (वित्त व लेखा) कार्यालयात

जमा केलेले आहेत. सबब, महाराष्ट्र राज्य लॉटरीची नवीन पारंपारिक सोडतींची तिकीट विक्रीसाठी ठोक अभिकर्ते म्हणून मे. सेरेनिटी ट्रेडस् प्रा.लि., मुंबई व मे. समित ऑनलाईन ट्रेड सोल्युशन्स प्रा.लि., मुंबई यांनी शासनाबरोबर केलेला दि.०३ सप्टेंबर,२०१३ रोजीचा करार, करारातील परिच्छेद १९(iv) मधील तरतुदींनुसार दि.०१/०८/२०१७ पासून रद्द करण्यात आला आहे.

२. मे. समित ऑनलाईन ट्रेड सोल्युशन्स प्रा.लि., मुंबई व मे. सेरेनिटी ट्रेडर्स प्रा.लि. यांनी सादर केलेल्या बँक गँरंटी दिनांक ०५/०९/२०१७, २१/०९/२०१७, १७/०९/२०१७ व २३/०९/२०१७ या कालावधीपर्यंत वैध होत्या सदर दिनांकांनंतर त्या बँक गॅरंटी संपुष्टांत आलेल्या आहेत. बँक गॅरंटींची वैधता विचारात घेऊन दि.३१ जुलै,२०१७ च्या सोडतींचा लेखा बंद करण्याबाबत उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवीमुंबई यांनी त्यांच्या स्तरावरून आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१३१२१५१७२३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Madhav Kundalik Avhad

Digitally signed by Madhav Kundalik Avhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=33f159af855e668523427acf7322c4c3427aed8bf6b0bf7eb4dfdd5490c3d843, cn=Madhav Kundalik Avhad
Date: 2017.10.13 12:03:40 +05'30'

(माधव आव्हाड)
कक्ष अधिकारी तथा
राज्य लॉटरी अधिकारी,वित्त विभाग.

प्रति,

१) महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा), महाराष्ट्र मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (व्यय) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) उप सचिव (राज्य लॉटरी),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त (अ.ब.व रा.लॉ.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५) उपसंचालक (वि व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवीमुंबई.
६) अधिदान व लेखाधिकारी /निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७) राज्य लॉटरी अधिकारी तथा कक्ष अधिकारी,लॉटरी -३,
८) लेखाधिकारी, रोख शाखा, महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय, मुंबई.
९) लेखा अधिकारी (प्रशासन/ लॉटरी), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवीमुंबई
१०) निवड नस्ती, लॉटरी-२.